25 MAR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बसवेश्वरांच्या वचन साहित्यात स्वाभिमानपूर्वक जगण्याचा संदेश

## डॉ. मांतेश हिरेमठ : विद्यापीठात व्याख्यानमाला

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २४ : 'महात्मा बसवेश्वर यांचे वचन साहित्य माणसाला निर्भीड आणि स्वाभिमानपूर्वक जगण्याचा संदेश देते', असे डॉ. मांतेश हिरेमठ यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठातील संत तुकाराम अध्यासन आयोजित श्री रघुनाथ स्वामी आनंदमूर्ती व्याख्यानमालेअंतर्गत 'क्रांतिकारी युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर यांचे वचन साहित्य' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. रणधीर शिंदे होते.

डॉ. हिरेमठ म्हणाले, 'महात्मा बसवेश्वर यांचे वचन साहित्य वाचकाला अंतर्मुख करते. बसवेश्वर जाती व्यवस्थेवर कडक प्रहार करतात. वचन साहित्यातून वेगवेगळ्या सामाजिक प्रश्नांवर भाष्य त्यांनी केले आहे. वचनसाहित्यात लोकभाषेचा पुरस्कार केलेला पाहावयास मिळतो.'



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानात बोलताना डॉ. मांतेश हिरेमठ.

डॉ. शिंदे म्हणाले, 'बसवेश्वरांचे वचनसाहित्य भारतीय साहित्यामधील एक अनमोल दागिना आहे. समाजप्रबोधनासाठी वचन साहित्य महत्त्वाचे ठरते. त्यामुळे त्यांचे महत्त्व अधोरेखित होते.'

डॉ. अनिल गवळी, अनमोल कोठाडिया, सुखदेव एकल उपस्थित होते. संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. रूपाली पाटील यांनी सूत्रसंचालन केले. वनिता पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 MAR 2025

तरुण भारत

# महाराष्ट्र अर्थसंकल्पावर उद्या परिसंवाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातर्फे (स्वायत्त) बुधवारी (दि. २६) 'महाराष्ट्राचा अर्थसंकल्प २०२५-२६' या विषयावर एकदिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते उद्या (दि. २६) सकाळी १० वाजता अर्थशास्त्र अधिविभागाच्या सेमिनार सभागृहात परिसंवादाचे उद्घाटन होईल. परिसंवादात डॉ. ज्ञानदेव तळुले, वाणिज्य अधिविभागाचे डॉ. केदार मारुलकर, आयसीएआय, कोल्हापूरचे चेअरमन नितीन हरगुडे, सीआयआय दक्षिण महाराष्ट्र विभागाचे चेअरमन सारंग जाधव आणि डॉ. सुभाष कोंबडे सहभागी होतील. डॉ. प्रकाश कांबळे अध्यक्षस्थानी असतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 MAR 2025
सकाळ



# 'महाराष्ट्र अर्थसंकल्पा'वर विद्यापीठात उद्या परिसंवाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातर्फे (स्वायत्त) बुधवारी (ता. २६) 'महाराष्ट्राचा अर्थसंकल्प २०२५-२६' या विषयावर परिसंवाद होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी दहा वाजता अर्थशास्त्र अधिविभागाच्या सेमिनार सभागृहात परिसंवादाचे उद्घाटन होईल. प्रा. डॉ. प्रकाश कांबळे अध्यक्षस्थानी असतील. परिसंवादात अर्थशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. ज्ञानदेव तळुले, वाणिज्य अधिविभागाचे डॉ. केदार मारुलकर, ज्येष्ठ पत्रकार डॉ. श्रीराम पवार, आयसीएआय कोल्हापूरचे अध्यक्ष नितीन हरगुडे, सीआयआय दक्षिण महाराष्ट्र विभागाचे अध्यक्ष सारंग जाधव, डॉ. सुभाष कोंबडे सहभागी होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 MAR 2025
लोकमत

# विद्यापीठात उद्या अर्थसंकल्पावर परिसंवाद

**कोल्हापुर :** शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातर्फे (स्वायत्त) उद्या, बुधवारी 'महाराष्ट्राचा अर्थसंकल्प २०२५-२६' या विषयावर परिसंवादाचे आयोजन केले आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत अर्थशास्त्र अधिविभागाच्या सेमिनार सभागृहात उद्घाटन होईल. वरिष्ठ प्राध्यापक डॉ. प्रकाश कांबळे अध्यक्षस्थानी असतील. प्राध्यापक डॉ. ज्ञानदेव तळुले, डॉ. केदार मारुलकर, नितीन हरगुडे, सारंग जाधव, डॉ. सुभाष कोंबडे सहभागी होतील.

महा न्यूज & व्ह्यूज

# शिवाजी विद्यापीठात बुधवारी महाराष्ट्र अर्थसंकल्पावर परिसंवाद

**कोल्हापूर ( महान्यूज अँड व्ह्यूज):**

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातर्फे (स्वायत्त) येत्या बुधवारी (दि. २६) 'महाराष्ट्राचा अर्थसंकल्प २०२५-२६' या विषयावर एकदिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी सकाळी १० वाजता अर्थशास्त्र अधिविभागाच्या सेमिनार सभागृहात परिसंवादाचे उद्घाटन होईल. परिसंवादात विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ. ज्ञानदेव तळुले, वाणिज्य अधिविभागाचे डॉ. केदार मारुलकर, ज्येष्ठ पत्रकार-संपादक डॉ. श्रीराम पवार, आयसीएआय, कोल्हापूरचे चेअरमन नितीन हरगुडे, सीआयआय दक्षिण महाराष्ट्र विभागाचे चेअरमन सारंग जाधव आणि डॉ. सुभाष कोंबडे सहभागी होतील. वरिष्ठ प्राध्यापक डॉ. प्रकाश कांबळे अध्यक्षस्थानी असतील.